लोकमत

महत्त्वाचे

# शरीरातील पेशींवर उद्या व्याख्यान

पुणे : आयसर, पुणे, एक्सायटिंग सायन्स ग्रुप, वेन्चर सेंटर, सीएसआयआर-एनसीएल यांच्यातर्फे 'पॉप्युलर सायन्स टॉक सिरीज'चे आयोजन करण्यात येते. येत्या रविवारी (दि. ३०) 'शरीरातील पेशींचे कार्य कसे चालते' या विषयावर डॉ. नागराज बालसुब्रमण्यम मार्गदर्शन करणार आहेत. हा कार्यक्रम ३० जून रोजी सकाळी १० वाजता पाषाण येथील आयसरमधील न्यू लेक्चर हॉलमध्ये आयोजिले आहे. नावनोंदणी आवश्यक असून, ७ ते १० पर्यंतच्या विद्यार्थ्यांना यात सहभागी होता येईल.